A

3222

Series :

**A**

# MARATHI

| प्रश्न–पुस्तिका क्रम संख्या<br>Question Booklet Sl. No. |
|---|
| 1012021 |

अनुक्रमांक
Roll No.

परीक्षार्थी अपना अनुक्रमांक दिए गए खानों में लिखें।
Candidate should write
Roll No. in the given boxes.

मुद्रित पृष्ठों की संख्या/No. of Printed Pages : **24**

कुल प्रश्नों की संख्या/Total No. of Questions : **150**

समय/Time : **3 घण्टे/Hours**

पूर्णांक/Total Marks : **600**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. परीक्षा प्रारम्भ होने के तुरन्त बाद, आप इस प्रश्न–पुस्तिका की पड़ताल अवश्य कर लें, कि इसमें कोई बिना छपा, फटा या छूटा हुआ पृष्ठ अथवा प्रश्नांश, आदि न हो। यदि ऐसा है, तो वीक्षक से तत्काल संपर्क कर प्रश्न–पुस्तिका बदल लेवें।
2. इस प्रश्न–पुस्तिका में **मराठी** से संबंधित कुल **150** प्रश्न हैं। **सभी** प्रश्न अनिवार्य हैं।
3. प्रदत्त उत्तर–पत्र (ओ.एम.आर. शीट) पर दिए गए निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें तथा अपने उत्तर तदनुसार अंकित करें।
4. कृपया उत्तर–पत्र (ओ.एम.आर. शीट) पर निर्धारित स्थानों पर आवश्यक प्रविष्टियाँ करें, अन्यत्र स्थानों पर नहीं।
5. परीक्षार्थी सभी रफ़ कार्य प्रश्न–पुस्तिका के अंतिम पृष्ठों पर निर्धारित स्थान पर ही करें, अन्यत्र कहीं नहीं तथा उत्तर–पत्र (ओ.एम.आर. शीट) पर भी नहीं।

## INSTRUCTIONS TO THE CANDIDATES

1. Immediately after the commencement of the examination, you should check that this Question Booklet ***does not*** have any unprinted or torn or missing pages or items etc. If so, immediately contact the Invigilator and get it replaced with another Question Booklet.
2. This Question Booklet contains Total **150** questions of concerned **Marathi** subject. **All** questions are compulsory.
3. Read carefully the instructions given on the Answer Sheet (OMR) supplied and indicate your answers accordingly.
4. Kindly make necessary entries on the Answer Sheet (OMR) at the places indicated and nowhere else.
5. Examinee should do all rough work on the space meant for rough work on pages given at the end of the Question Booklet and nowhere else, not even on the Answer Sheet (OMR).



SEAL

# द्वितीय प्रश्न–पत्र
## मराठी

1. विजय तेंडूलकर यांनी 'कोवळी उन्हे' या ललित गद्यात कोणत्या जीवनाचा वेध घेतला आहे ?

   (A) ग्रामीण जीवन

   (B) महानगरीय जीवन

   (C) गुन्हेगारी जीवन

   (D) विद्यार्थी जीवन

2. निम्नलिखित कोणत्या कादंबरीत व्यस्ततावादी (absurd) जीवनदर्शन आलेले आहे ?

   (A) वासुनाका

   (B) कोसला

   (C) झाडाघती

   (D) बारोमास

3. 'झेप' ही ना. स. इनामदार यांची ऐतिहासिक कादंबरी कुणाच्या जीवन चरित्रावर आधारलेली आहे ?

   (A) तानाजी मालुसरे

   (B) बाजीप्रभू देशपांडे

   (C) नाना फडणवीस

   (D) त्रिंबकजी डेंगळे

4. 'रथ' हा कथासंग्रह कोणत्या कथालेखकाचा आहे ?

   (A) रंगनाथ पठारे

   (B) श्रीराम गुंदेकर

   (C) आसाराम लोमटे

   (D) यु. म. पठाण

5. 'दर्शन' या कथेत चारूता सागर यांनी कुठला विषय मांडला आहे ?

   (A) शेतकऱ्यांचा

   (B) जोगतिणींचा

   (C) अनाथ बालकांचा

   (D) व्यापाऱ्यांचा

6. 'वाङ्मयेतिहासाची संकल्पना' या ग्रंथाचे संपादक कोण आहेत ?

   (A) वा. ल. कुलकर्णी

   (B) आनंद यादव

   (C) अ. रा. कुलकर्णी

   (D) दत्तात्रय पुंडे

7. "एका विशिष्ट भाषेतील समग्र वाङ्मयकृतींचा आणि वाङ्मयीन घडामोडींचा एक विशिष्ट दृष्टिकोण घेऊन केलेला ऐतिहासिक अभ्यास म्हणजे ______ होय."

(A) वाङ्मयेतिहास

(B) संस्कृती इतिहास

(C) राष्ट्रेतिहास

(D) समीक्षा

8. "कोणतेही मूल्यमापनात्मक वा विवेचक सूत्र न घेता लेखक आणि त्यांच्या वाङ्मयकृती यांची केवळ कालक्रमानुसार मांडणी केलेल्या वाङ्मयेतिहासाला ______ वाङ्मयेतिहास म्हणतात."

(A) अनुबंधलक्ष्यी

(B) कालक्रमवाचक

(C) सौंदर्यलक्ष्यी

(D) तार्किक प्रत्यक्षार्थवादी

9. महानुभाव संप्रदायासंबंधी खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?

(A) महानुभाव वाङ्मय पंथनिष्ठेच्या प्रेरणेनेच निर्माण झाले

(B) 'रुक्मिणी स्वयंवर' हे नरेंद्राचे काव्य आहे

(C) महानुभाव पंथातील रचनाकारांनी लोकभाषेत साहित्य निर्मिती केली नाही

(D) 'गुंडमराउळ' पंचकृष्णांपैकी एक आहेत

10. खालील कवींपैकी कोण वारकरी संप्रदायाशी संबंधित **नाही** ?

(A) संत चोखा मेळा

(B) संत जनाबाई

(C) संत बहिवाबाई

(D) समर्थ रामदास

11. साहित्यनिर्मितीमध्ये अबुद्धिपुरस्सर आणि बुद्धिपुरस्सर अशी वाङ्मयाची विभागणी कोणी केली ?

(A) काका कालेलकर

(B) वा. म. जोशी

(C) बाळशास्त्री जांभेकर

(D) विष्णूशास्त्री चिपळूणकर

12. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) न. चिं. केळकर

(B) श्री. कृ. ओक

(C) वि. दा. सावरकर

(D) श्री. व्यं. केतकर

13. मराठी भाषेचेव्याकरण इंग्रजीत प्रथम कोणी तयार केले ?

(A) सेंट मैथ्यू

(B) डॉ. विलियम कैरी

(C) पंडित वैज्ञनाथ शर्मा

(D) लॉर्ड वेलेस्ली

14. 'कवि, काव्य, काव्यरति' हा लेख गो. ग. आगरकरांनी कोणत्या वृत्तपत्रातून प्रकाशित केला ?

(A) सुधारक

(B) नीतिदर्पण

(C) केसरी

(D) आजचा सुधारक

15. १९४१ साली 'नाट्यनिकेतन' या संस्थेची स्थापना कोणी केली ?

(A) आचार्य अत्रे

(B) कृ. प्र. खाडिलकर

(C) मो. ग. रांगणेकर

(D) वि. वा. शिरवाडकर

16. पत्रात्मक लेखनाची पध्दत पु. शि. रेगे यांनी त्यांच्या कोणत्या कादंबरीत वापरली आहे ?

(A) सावित्री

(B) रेणू

(C) मातृका

(D) अवलोकिता

17. 'केळीचे सुकले बाग' या नाटकात चि. त्र्यं. खानोलकरांनी कोणता विषय हाताळला आहे ?

(A) वैश्यांचा

(B) देवदासींचा

(C) तृतीयपंथीयांचा

(D) विधवांचा

18. 'अजब न्याय वर्तूळाचा' हे चि. त्र्यं. खानोलकरांचे नाटक कोणत्या इंग्रजी नाटकावर आधारलेले आहे ?

(A) हॅम्लेट

(B) मॅकबेथ

(C) कॉकोशिअन चॉक सर्कल !

(D) लुक बॅक इन अँगर

19. 'कविता ही डेंजर गोष्ट आहे' सदरील लेखाचे लेखक कोन आहेत ?

(A) दिलीप चित्रे

(B) भालचंद्र नेमाडे

(C) राजा ढाले

(D) अशोक शहाणे

20. 'भावमुद्रा' हे ललितगद्य कुणाचे आहे ?

(A) दुर्गा भागवत

(B) कुसुमावती देशपांडे

(C) विजय तेंडूलकर

(D) श्रीनिवास विनायक कुलकर्णी

21. भारतीय साहित्यशास्त्रात नववा रस कोणता मानण्यात आला आहे ?

(A) अद्भुत

(B) हास्य

(C) शांत

(D) शृंगार

22. "शब्दार्थौ सहितौ काव्यम ।"– म्हणजेच, 'शब्द आणि अर्थ यांचे सहितत्त्व म्हणजे काव्य', अशी काव्याची व्याख्या कोणी केली आहे ?

(A) भामह

(B) जगन्नाथ

(C) दण्डी

(D) विद्यानाथ

23. संस्कृत काव्यशास्त्राचा बीजग्रंथ कोणत्या ग्रंथाला म्हटले गेले आहे ?

(A) काव्यादर्श

(B) काव्यालंकार

(C) नाट्यशास्त्र

(D) रसगंगाधर

24. काव्यसौंदर्य वक्रोक्तीत असते. या अर्थसंस्काराला भामह याने काय म्हटले आहे ?

(A) अलंकार

(B) ध्वनी

(C) रूप

(D) काव्यलोचन

25. 'औचित्यविचार चर्चा' या ग्रंथाचे लेखन कोणी केले आहे ?

(A) वामन

(B) क्षेमेंद्र

(C) कुंतक

(D) अभिनवगुप्त

26. कधी कधी काही भाषा त्यांच्या मूळ स्वभावाप्रमाणे मूळ _______ मध्ये निरनिराळे बदल करतात. उदा. हिंदीमध्ये तृण > तिण तर गुजरातीमध्ये कृतम् > किदो होते आणि पंजाबीत कीता होते.

(A) ऋ

(B) लृ

(C) ञ

(D) ङ्

27. मानवी भाषेचे मूलघटक कोणते आहेत ?

(A) माधुर्य

(B) ध्वनि

(C) उच्चार

(D) यापैकी नाही

28. राजकीय कारणाने मराठीचा फारशी भाषेशी जवळ जवळ _______ वर्षे संबंध आला आणि त्यातून फारसीतील काही स्वन, शब्द, व्याकरणिक वैशिष्ट्ये सोबत काही वाक्यप्रचार देखील मराठीमध्ये सामावून गेले.

(A) साडेचारशे (४५०)

(B) साडेपाचशे (५५०)

(C) साडेसहाशे (६५०)

(D) यापैकी नाही

29. यादवकालीन मराठी भाषेतील शब्दांचे व शब्दरूपांचे साम्य है _______ शब्दरूपांशी दिसणे इतिहासाला धरुनच आहे.

(A) वऱ्हाडीतील

(B) मराठवाड्यातील

(C) कानडीभाषेतील

(D) मऱ्हाटीतील

30. महानुभाव पंथाचे अभ्यासक डॉ. वि. भि. कोलते यांनी श्रीगोविंदप्रभुचरित्रातील अनेक वऱ्हाडी भाषेतील _______ दाखविले आहेत.

(A) शब्दविशेष

(B) घरगुती प्रादेशिक शब्द

(C) खानदेशी शब्द

(D) वरील सर्व

31. 'सुखदायक राज्यप्रकरणी' या शीर्षकाच्या चिंतनशील निबंधाचे लेखक कोण ?

(A) लोकहितवादी

(B) विष्णुबुवा ब्रह्मचारी

(C) भाऊ महाजन

(D) गो. ना. माडगावकर

32. ह. ना. आपटे यांची सामाजिक सुधारणेला वाहिलेली एकमेव कथा कोणती ?

(A) दुर्गाताईची ओवाळणी

(B) काळ तर मोठा कठीणझाला

(C) पहिले भांडण

(D) पुरी हौस फिटली

33. अद्भुतरम्य कादंबरीची परंपरा कोणत्या कादंबरी पासून सुरु झाली ?

(A) प्रेमबंधन

(B) मुक्तामाला

(C) मंजुळा

(D) मदनमंजरी

34. 'थोरले माधवराव पेशवे' या नाटकाचे लेखक कोण ?

(A) का. गो. नातू

(B) महादेव चितळे

(C) विष्णु मोरेश्वर महाजनी

(D) विनायकराव कीर्तने

35. 'सॉक्रेटिसाचे चरित्र' इंग्रजीतून मराठीत कोणी भाषांतरित केले ?

(A) कृ. ह. जोगळेकर

(B) रा. गो. करंदीकर

(C) कृष्णशास्त्री चिपळूणकर

(D) बाळशास्त्री जांभेकर

36. 'होळकरशाहीतील पोवाडे' या पुस्तकाचे संपादक कोण ?

(A) शाहीर रामजोशी

(B) शाहीर अनंतफंदी

(C) वि. सो. सरवटे

(D) बाळकृष्ण आत्माराम गुप्ते

37. 'होळकर रियासतीचा सांस्कृतिक इतिहास' या ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) डॉ. शशिकांत सावंत

(B) डॉ. ना. ग. काळे

(C) डॉ. देवीदास पोटे

(D) डॉ. गणेश मतकर

38. 'अहिल्याकामधेनू' या ग्रंथाची रचना कोणत्या राज्यकर्त्यांच्या काळात झाली ?

(A) मल्हारराव होळकर

(B) अहिल्याबाई होळकर

(C) मार्तंडराव होळकर

(D) तुकोजीराव होळकर

39. श्री निरंजन जमींदार यांनी कोणती कादंबरी लिहिली ?

(A) क्षिप्रा

(B) आणि क्षिप्रा वाइन राहिली

(C) सरहद्द

(D) जन हे वोळतू जेथे

40. 'ब्रम्हावर्त' कादंबरीला कोणता पुरस्कार मिळाला ?

(A) भारत सरकार साहित्य अकादमी

(B) महाराष्ट्र शासन मराठी साहित्य महामंडळ

(C) अहिल्याबाई होळकर साहित्य समिती

(D) म. प्र. शासन 'भा. रा. तांबे' पुरस्कार (साहित्य अकादमी)

41. रविकिरण मंडळ कालीन कवितेतील सांकेतिकतेचे विडंबन खालीलपैकी कोणत्या काव्यसंग्रहातून केलेले आहे ?

(A) चित्रवीणा

(B) किनारा

(C) झेंडूची फुले

(D) गंधरेखा

42. 'गज्जलांजलि' हा गझलरचनेचा संग्रह कोणाचा आहे ?

(A) सुरेश भट

(B) माधवराव पटवर्धन

(C) ग्रेस

(D) भीमराव पांचाळे

43. केशवसुत, टिळक, विनायक, गोविंदाग्रज यांच्याबरोबरचे आधुनिक कविपंचकातील पाचवे कवी कोण आहेत ?

(A) भा. रा. तांबे

(B) कुसुमाग्रज

(C) गोविंदाग्रज

(D) बालकवी

44. 'भंगू दे काठिन्य माझे' ही कविता कोणाची आहे ?

(A) बा. सी. मर्ढेकर

(B) वा. रा. कांत

(C) भा. रा. तांबे

(D) आरती प्रभू

45. खालीलपैकी कोणते मराठी नवकाव्य दुर्बोध होण्याचे कारण **नाही** ?

(A) नव्या कवितातील आशयाची व्यामिश्रता

(B) अंतर्मनातील वास्तवाचा आविष्कार करण्याची धडपड

(C) सरळ आणि सोप्या शब्दांत भाव व्यक्त करणे

(D) संदर्भ संपृक्तता व मिथ्सचा वापर

46. महात्मा जोतिराव फुले यांचे गद्य मुख्यत्वे हिंदू संस्कृतीची सबंध संरचना बदलवू पाहणाऱ्या देशीपणाच्या लिहिले असल्यामुळेच ते अभूतपूर्व उतरले असल्याचे मत कोणी मांडले ?

(A) रावसाहेब कसबे

(B) भालचंद्र नेमाडे

(C) न्यायमूर्ती रानडे

(D) दि. पु. चित्रे

47. 'गांधी–आंबेडकर' या नाटकाचे लेखक कोण आहेत ?

(A) प्रेमानंद गज्वी

(B) प्रकाश त्रिभूवन

(C) दत्ता भगन

(D) भि. सी. शिंदे

48. 'जातिचा दशकू' ही रचना कोणत्या महानुभाव लेखकाची आहे ?

(A) महदंबा

(B) भास्करभट्ट

(C) म्हाईंभट

(D) केशीराजबास

49. 'स्त्री–पुरूष तुलना' या ग्रंथाचे लेखन कोणी केले ?

(A) पंडीता रमाबाई

(B) ताराबाई शिंदे

(C) विभावरी शिरूरकर

(D) फेरारबाई

50. 'शिळोप्याच्या गोष्टी' हा कथासंग्रह कोणाच्या नावावर आहे ?

(A) आनंदीबाई शिर्के

(B) गिरिजाबाई केळकर

(C) वामनसुता

(D) काशीबाई कानिटकर

51. लोकसाहित्याच्या अभ्यासाची साधने म्हणजे ____________ साधने होत.

(A) लोकगीते, लोककथा

(B) लोककला, लोकनाट्य

(C) लोकसांस्कृतिक परंपरा, चालीरीती

(D) वरील सर्व

52. प्राचीन ग्रंथनिविष्ट पार्श्वभूमी नजरेआड करता येत नाही. नव्हे, अजूनही प्रचलित लोकसाहित्याचा प्राण या ________ प्रथांतच गुरफटलेला आढळून येतो.

(A) पुरातन

(B) आधुनिक

(C) बायबल मधून

(D) यापैकी नाही

53. स्त्रियांच्या आवडीनिवडी या गाण्यांमधून प्रकट होतात त्याचप्रमाणे सासरा, सासू, नणंद या नात्यांतील माणसांविषयी त्यांना वाटत असलेले ________ भावनांचा आविष्कार या गाव्यांमधून व्यक्त होतो.

(A) प्रेम

(B) मत्सर

(C) द्वेष

(D) वरील सर्व

54. दुर्गा भागवत यांचा ________ हा ग्रंथ लोककथा प्रकारांची शास्त्रीय चर्चा करणारा मराठीतील एकमेव ग्रंथ आहे.

(A) लोककथा

(B) मराठवाडयातील लोककथा

(C) लोकसाहित्याची रूपरेखा

(D) जनलोकांचा सामवेद

55. महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या हक्कांसाठी लढे देऊन दलितांमध्ये ________ जाणीव निर्माण केली आणि १९५६ साली धर्मांतर घडवून आंबेडकरांनी एक प्रकारे सामाजिक परिवर्तन घडवून आणले.

(A) विद्रोह

(B) संघर्ष

(C) आस्मितेची

(D) यापैकी नाही

56. मराठी मासिक 'अर्घ्य' चे संपादक कोण आहेत ?

(A) डॉ. राम देशमुख

(B) अनिलकुमार धडवईवाले

(C) दीपक खरे

(D) रामराव देशमुख

57. कादंबरीकार डॉ. शशिकांत जोशी यांचे एकमेव नाटक कोणते ?

(A) अभिमन्यू

(B) दत्तक जावई

(C) मानस कां बधिरावे

(D) नवा डाव

58. अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर इंग्रजीत काव्य कोणी लिहिले ?

(A) डॉ. एन. जी. काले

(B) डॉ. गणेश मतकर

(C) श्रीमती जोना बेली

(D) सी. ए. डाब्सन

59. प्रभाकर वामन उध्वरेषे यांच्या आत्मचरित्राचे शीर्षक कोणते ?

(A) हरवलेले दिवस

(B) असा मी घडलो

(C) असा मी जगलो

(D) क्रांती ते उत्क्रांती

60. 'ऐका हो' हे नाटक कुणी लिहिले ?

(A) गणेश मतकर

(B) बाबा डिके

(C) राजन देशमुख

(D) नाना दुराफे

61. विशिष्ट साहित्यकृतीची समीक्षा कोणत्या साहित्य प्रकारात समाविष्ट होते ?

(A) तात्विक समीक्षा

(B) उपयोजित समीक्षा

(C) शैली वैज्ञानिक समीक्षा

(D) आदिबंधात्मक समीक्षा

62. सौंदर्यशास्त्र विश्वातील 'अर्थपूर्ण आकार' आणि 'सौंदर्यभावना' चा दोन महत्वाच्या संकल्पना कोणी मांडल्या ?

(A) क्लाइव्ह बेल

(B) रॉजर फ्राय

(C) ब्रँडर मॅथ्यूज

(D) हॅमिल्टन

63. साहित्यकृतीच्या सौंदर्यसर्जक विशेष अर्थाचे आकलन करण्यासाठी वाचक-समीक्षकाला कोणत्या गोष्टीचे ज्ञान असणे आवश्यक आहे ?

(A) वाङ्मयीन ज्ञान

(B) व्यवहार ज्ञान

(C) भाषाज्ञान

(D) वरीलपैकी नाही

64. 'सौंदर्यमीमांसा' हा ग्रंथ कोणी लिहीला ?

(A) रा. ग. जाधव

(B) रा. भा. पाटणकर

(C) प्रभाकर पाध्ये

(D) शरच्चंद्र मुक्तीबोध

65. कोणत्या साहित्यसमीक्षेत साहित्याचा इतिहास सांगताना आपण एकाच परंपरेचा कालानुरोधाने शोध घेतो ?

(A) रूपवादी समीक्षा

(B) ऐतिहासीक समीक्षा

(C) सौंदर्यवादी समीक्षा

(D) तौलनिक समीक्षा

66. मराठीतील पहिली लघुपत्रिका कोणती ?

(A) ज्ञानप्रसारक

(B) शब्द

(C) विविधज्ञानविस्तार

(D) दर्पण

67. मराठी गद्यावर इंग्रजी विचारांचा प्रभाव प्रारंभी कोणत्या नियतकालिकातून दिसून येत होता ?

(A) ज्ञानप्रसारक

(B) विविधज्ञानविस्तार

(C) दर्पण

(D) शब्द

68. 'इंग्रजांचे सर्वांनी अनुकरण करणे अयोग्य होय'. अशा प्रकारचे लेख कोणत्या नियतकालिकातून येत असत ?

(A) विविधज्ञानविस्तार

(B) चंद्रिका

(C) ज्ञानसंग्रह

(D) पुणे पाठशाळापत्रक

69. 'विविधज्ञानविस्तार' या मासिकाचा मूळ उद्देश कोणता ?

(A) समजातील विचारशक्तीचे पुनरुज्जीवन करणे

(B) विचारवंतांना लिहिते करणे

(C) नवीन प्रयोग करणे

(D) इंग्रजांवर लेखनीतून प्रहार करणे

70. ''प्रभाकर' मधून लिहिलेली पत्रे म्हणजे आधुनिक मराठी निबंधाची गंगोत्री होय'. असा उल्लेख कोणत्या निबंधकाराच्या संदर्भात केला जातो ?

(A) वि. ना. मंडलिक

(B) दादोबा पांडुरंग

(C) लोकहितवादी

(D) भाऊ महाजन

71. अमच्या, अम्हांस, अण, अश्विवाद, माफिक, हिमान आणि लाखोटा हे स्वर प्रक्रिया कोणत्या काळात वापरली गेली ?

(A) शिवकाळ

(B) पेशवेकाळ

(C) बहामनीकाळ

(D) यादवकाळ

72. पाणिनी, कात्यायन व पतंजली ह्या तिघांना कोणत्या भाषेच्या व्याकरणाचे 'मुनित्रय' म्हणतात ?

(A) प्राकृत

(B) संस्कृत

(C) पाली

(D) रशियन

73. भाषाभ्यासाची सुरुवात सर्वप्रथम कोणत्या देशात झाली ?

(A) रशिया

(B) जपान

(C) भारत

(D) ग्रीक

**74.** मूळ आशयाशी कार्यकारणसंबंध नसलेल्या ध्वनिसंकेतांनी बनलेली, समाजव्यवहाराला साह्यभूत अशी पद्धत म्हणजे भाषा अशी भाषेची व्याख्या कोणी केली ?

(A) ना. गो. कालेलकर

(B) कृ. पा. कुलकर्णी

(C) द. दि. पुंडे

(D) चं. द. इंदापूरकर

**75.** निजामशाहीतील उनकेश्वरांचा शिलालेख कोणत्या शतकातील आहे ?

(A) 1211

(B) 1212

(C) 1213

(D) 1214

**76.** "सुंदरा मनामध्यें भरली जरा नाहीं ठरली हवेंलित शिरली" ही लावणी कोणी रचली आहे ?

(A) परशुराम

(B) रामजोशी

(C) प्रभाकर

(D) होनाजीबाळा

**77.** "पुण्याच्या मोंडाला । जेजुरीच्या बारीला । आहे सिंहगड किल्ला । तो घेऊन द्यावा मला । आऊक्ष मागेन तुझ्या राज्याला ।" – या काव्यपंक्ती कोणी रचल्या ?

(A) शाहीर तुळशीदास

(B) शाहीर आगिनदास

(C) शाहीर होनाजीबाळा

(D) शाहीर परशुराम

**78.** खाली संत व त्यांच्या रचना दिलेल्या आहेत. यातील चुकीची जोडी ओळखा.

I. संत एकनाथ : "वारियानें कुंडल हाले । डोळे मोडित राधा चाले"

II. संत ज्ञानेश्वर : "चंदनाची चोळी । माझें सर्व अंग पोळी"

III. संत तुकाराम : "नाही निर्मळ जीवन, काय करील साबण ?"

IV. संत नामदेव : "रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन"

(A) I चूक

(B) II चूक

(C) III चूक

(D) IV चूक

**79.** खाली संत व संबंधित संप्रदाय अशा जोड्या दिल्या आहेत. त्यांतील चुकीची जोडी ओळखा ।

I. श्रीगोविंदप्रभू – वारकरी संप्रदाय

II. श्रीनृसिंह सरस्वती – दत्त संप्रदाय

III. श्रीचक्रधर – महानुभाव संप्रदाय

IV. गोरक्षनाथ – नाथ संप्रदाय

(A) I चूक

(B) II चूक

(C) III चूक

(D) IV चूक

**80.** चक्रधरांच्या आदेशाला अनुसरून मराठीचा आग्रह धरणारे महानुभावीय आचार्य कोण ?

(A) नामदेव

(B) परशुराम

(C) नागदेवाचार्य

(D) केसोबास

81. भाषेचे मूलभूत कार्य म्हणजे ________ होय.

(A) सामाजिक संदेशन

(B) भाषिक संदेशन

(C) वैज्ञानिक संदेशन

(D) भौगोलिक संदेशन

82. महानुभाव संप्रदायातील पहिल्या पिढीतील व ज्ञानेश्वर समकालीन विदुषी की जी नागदेवाचार्यांची चुलत बहीणीचे नाव काय ?

(A) जनाबाई

(B) महदेबा (रूपाई)

(C) मुक्ताई

(D) यापैकी नाही

83. मध्यप्रदेशातील बस्तर, कांकेर, रायपूर आणि महाराष्ट्रातील चंद्रपूर, भंडारा इत्यादी प्रदेशातील लोकांची बोली कोणती आहे ?

(A) हळबी

(B) नागपुरी

(C) अहिराणी

(D) डांगी

84. भाषाविज्ञानाच्या विविध शाखांपैकी ज्या शाखेमध्ये अशा स्थानिक भाषा भेदांचा पध्दतशीरपणे अभ्यास केला जातो, तिला _______ असे म्हणतात.

(A) बोली भूगोल (Dialect Geography)

(B) प्रादेशिक भूगोल

(C) सांस्कृतिक भूगोल

(D) राजकीय भूगोल

85. शिलालेख म्हणजे ________ रेघच असल्यामुळे त्यावरील भाषेच्या स्वरूपात कसलाही दोष उत्पन्न होणे अथवा आढळणे जवळपास अशक्य प्राय गोष्ट आहे.

(A) शिलालेख

(B) ताम्रपट

(C) भूर्जपत्र

(D) ताडपत्रावरील लेखन

86. सानिया यांचा प्रथम कथासंग्रह कधी प्रकाशित झाला होता ?

(A) १९९०

(B) १९७५

(C) १९८०

(D) १९८५

87. लोककथा 78 हे नाटक कुणाचे आहे ?

(A) रत्नाकर मतकरी

(B) जयंत पवार

(C) सतीष आळेकर

(D) महेश एलकुंचवार

88. गंगाधर गाडगीळ यांच्या लोकमान्य टिळकांवर केंद्रित द्विखंडात्मक चरित्रात्मक कादंबरीचा द्वितीय खंड कधी प्रकाशित झाला होता ?

(A) १९७०

(B) १९८५

(C) १९७२

(D) १९७१

89. कै. वि. लं. भावे, न्यायमूर्ति म. गो. रानडे, कै. लं. रा. पांगारकर, कै. ग. ज. आगाशे आणि प्रो. मोती बुलासा यांनी कोणत्या वर्षी वाङ्मयतिहास लेखनास प्रारंभ केला होता ?

(A) १९६०

(B) १९७०

(C) १९९८

(D) १८९८

90. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे स्थापना वर्ष कोणते आहे ?

(A) १९७०

(B) १९८०

(C) १९९०

(D) १९६०

91. मराठी समीक्षेतील साहित्यविचाराला शास्त्रीय वळण कोणाच्या भूमिकेमुळे मिळाले ?

(A) रा. ग. जाधव

(B) बा. सी. मर्ढेकर

(C) गो. म. कुलकर्णी

(D) व. दि. कुलकर्णी

92. सर्व ललितकलांना सामावून घेणारी सौंदर्याची उपपत्ती कोणी मांडली ?

(A) रा. भा. पाटणकर

(B) रा. ग. जाधव

(C) बा. सी. मर्ढेकर

(D) ल. ग. जोग

93. 'नवकाव्याचे जनक' म्हणून कोणास संबोधले जाते ?

(A) केशवसूत

(B) बा. सी. मर्ढेकर

(C) ना. सी. फडके

(D) वा. म. जोशी

94. आधुनिक मराठीतील/महत्वाचे पहिले वहिले समीक्षक म्हणून कोणास ओळखले जाते ?

(A) ल. रा. पांगारकर

(B) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

(C) विष्णुशास्त्री चिपळूणकर

(D) वि. वा. भिडे

95. कोणत्या साहित्यविषयक लेखनप्रकाराला लेखक व वाचक यांच्यातील दुवा मानले जाते ?

(A) कादंबरी

(B) दैनंदिनी

(C) समीक्षा

(D) इतिहास

96. __________ या अशोक व्हटकरलिखित प्रतिकात्मक कादंबरीमध्ये अस्पृशांमध्ये असणारी उच्चनीचता सांगण्याचा, हा अतिशय चांगला प्रयत्न आहे.

(A) माझं गाव कुठाय ?

(B) मेलेलं पाणी

(C) झपाटलेला

(D) फकिरा

97. ________ हे केंद्र असलेले साहित्यच ग्रामीण असते, असा यादवांनी आग्रह धरला व त्याबरहुकूम त्यांनी आपली साहित्य निर्मिती केली.

(A) ग्रामजीवन

(B) ग्रामसंस्कृती

(C) ग्रामीणता

(D) वरील सर्व

98. खरा भारत खेड्यात आहे या महात्मा गांधीच्या वचनामध्ये खरी _______ संस्कृती खेड्यात आहे हा व्यापक अर्थ दडला आहे.

(A) भारतीय संस्कृती

(B) ग्रामजीवन

(C) आदिम जीवन

(D) ग्रामसंस्कृती

99. मराठी साहित्यात आदिम जमातीकडे _______ यांनी प्रथम लक्ष वेधले, असे मत कुसुमावती देशपांडे यांनी नोंदविले आहे.

(A) नजूबाई गावित

(B) डॉ. विनायक तुमराम

(C) र. वा. दिघे

(D) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

100. जागतिक लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या सुरुवाती बरोबरच भारतीय मिथ्थके आणि युरोपीय भाषेतील मिथ्थके यांच्यात परस्परसंबंध आहे. असे विधान ग्रीम्स बंधूनी इ. स. _______ साली केले आहे.

(A) १८३०

(B) १८३५

(C) १८४०

(D) १८४५

101. 'बाजीराव मस्तानी' या नाटकाचे रचनाकार कोण ?

(A) बाबा डिके

(B) राजन देशमुख

(C) गणेश मतकर

(D) नाना दुराफे

102. 'कारकूना' हे नाटक कोणी लिहिले ?

(A) गणेश मतकर

(B) राजन देशमुख

(C) बाबा डिके

(D) मनोहर जोशी

103. श्री. व. ग. देशमुख यांच्या कथासंग्रहाचे शीर्षक कोणते ?

(A) पाणी

(B) वळ

(C) नवे जग

(D) अनार

104. अव्वल इंग्रजी काळात 'कादंबरी' ऐवजी नावल हे नाव कोणी रूढ केले ?

(A) कृ. गं. कवचाळे

(B) काशीनाथ बाळकृष्ण मराठे

(C) रियासतकार सरदेसाई

(D) राव नंदलाल मंडलोई

105. डॉ. शशिकांत जोशी यांची प्रथम कादंबरी कोणती ?

(A) शिशिर

(B) मृत्यु माझा वैरी

(C) नेत्र निरांजन

(D) कुणाच्या हाका अनोळखी वाटा

106. संतांच्या अभंगरचनेचा खालीलपैकी कोणता हेतू नव्हता ?

(A) नामस्मरण

(B) परमेश्वराच्या भेटीची तळमळ

(C) देवाशी प्रेमकलह

(D) अर्थप्राप्ती

107. परमार्थविचार घरोघरी पोचविण्यासाठी 'भारुड' या काव्यप्रकाराचा वापर कोणी केला ?

(A) वामनपंडित

(B) संत एकनाथ

(C) चक्रधर स्वामी

(D) मुकुंदराज

108. "मराठीतील पंडिती काव्य हे अभिजात संस्कृत वाङ्मयाचे, मुख्यत: पंचमहाकाव्ये व हनुमन्नाटक इत्यादींचे पुनरुज्जीवन आहे." हे मत खालीलपैकी कोणाचे आहे ?

(A) विलास खोले

(B) वि. भि. कोलते

(C) के. ना. वाटवे

(D) वि. ल. भावे

109. "जैसी हरलंमाजि रत्नकिल । कि रत्नांमाजि हिरा निल ।
तैया भाषामाजि चोखल । भाषा मराठी ।।"
– मराठी भाषेची महती व्यक्त करणाऱ्या वरील काव्यपंक्ती कोणाच्या आहेत ?

(A) रॉक कार्व्हालो

(B) रेव्ह. ना. वा. टिळक

(C) इनास कून

(D) फादर थॉमस स्टिफन्स

**110.** खालीलपैकी कोणी महाराष्ट्राबाहेर राहून उत्कृष्ट काव्यरचना केली ?

(A) भा. रा. तांबे

(B) बालकवी

(C) केशवसुत

(D) ग्रेस

**111.** रीती हे काव्याचे प्राणतत्त्व होय व सौंदर्यतत्त्व होय, असे कोणी म्हटले आहे ?

(A) कुंतक

(B) राजशेखर

(C) वामन

(D) शूद्रक

**112.** "काव्यस्यात्मा ध्वनि:" या शब्दांत ध्वनि सिद्धांताची मांडणी कोणी केली आहे ?

(A) अभिनवगुप्त

(B) हेमचंद्र

(C) श्रीशंकुक

(D) आनंदवर्धन

**113.** "प्रतिभा अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा" या शब्दांत प्रतिभेचा गुणगौरव कोणी केला आहे ?

(A) अभिनवगुप्त

(B) रुद्रट

(C) कुंतक

(D) गुणचंद्र

**114.** केवळ मानसिकतेवरचं नव्हे तर एकूण शारीरिक–मानसिक परिस्थितीमागील रासायनिक घडणीवर वाङ्मयकृतीचे स्वरूप ठरत असते, ही भूमिका 'वाङ्मयकृतीची रासायनिक उत्पत्ती' या लेखात कोणी मांडली आहे ?

(A) भालचंद्र नेमाडे

(B) द. ग. गोडसे

(C) विलास सारंग

(D) दि. के. बेडेकर

**115.** अभिनवगुप्त यांनी नाट्य प्रयोगाच्या संदर्भात किती रसविघ्नांचा उल्लेख केला आहे ?

(A) पाच

(B) सात

(C) नऊ

(D) दहा

**116.** मराठी संतमंडळात 'कबीराचा अवतार' म्हणून खालीलपैकी कोणत्या संतकवीस ओळखले जाते ?

(A) शेख महंमद

(B) संत एकनाथ

(C) संत दासोपंत

(D) कृष्णदास मुद्गल

**117.** 'अमृतानुभव' ग्रंथाचे कर्ते खालीलपैकी कोण आहेत ?

(A) संत नामदेव

(B) संत ज्ञानेश्वर

(C) संत रामदेव

(D) संत एकनाथ

118. "कवित्व असावें सोपे । कवित्व असावें अल्परूपें । कवित्व असावें सुलभ । चरणबंद ।।"
कवित्वासंबंधीच्या या पंक्ती कोणच्या आहेत ?

(A) संत नामदेव

(B) संत तुकाराम

(C) समर्थ रामदास

(D) संत निवृत्तिनाथ

119. "ऊंस डोंगा परि रस नोहे डोंगा ।" "जोहार मायबाप जोहार", "धांव घाली विठू आतां। " या अभंगांचे कर्ते कोण आहेत ?

(A) सावता माळी

(B) नरहरी सोनार

(C) चोखा मेळा

(D) निकोबा पिंपळनेरकर

120. ग्रंथ व ग्रंथकारांच्या जोड्या वाचून योग्य जोडीची निवड करा.

I. मऱ्हाठी लावणी – म. ना. अदवंत

II. पैंजण – म. वा. धोंड

III. अंधारातील लावण्या – य. न. केळकर

IV. मराठी शाहीर – म. ना. सहस्रबुद्धे

(A) I बरोबर

(B) II बरोबर

(C) III बरोबर

(D) IV बरोबर

121. "पांढरपेशा थराने दिमाखाने जपलेली अलवार घरंदाज भाषा नामदेव ढसाळ एखादया बटकीसारखी वाकवतो. निर्दयपणे तिची मोडतोड करतो अथवा तिच्यात अशिष्ट भर घालून तिचे बुइध्याच एक विद्रूप करतो. त्याच्या कवितेच्या आशयासाठी हे सारे त्याला आवश्यक वाटते."
नामदेव ढसाळ यांच्या कवितेच्या भाषा वैशिष्ट्यांविषयी वरील मत कोणाचे आहे ?

(A) रमेश तेंडुलकर

(B) र. रा. गोसाकी

(C) विजय तेंडुलकर

(D) शरणकुमार लिंबाळे

122. खाली आदिवासी कवी व त्यांचे कवितासंग्रह अशा जोड्या दिलेल्या आहेत. त्यांतील चुकीचा पर्याय ओळखा.

(A) विनायक तुमराम–गोंडवन पेटले आहे

(B) नीलकांत कुलसंगे–वणसूर्य

(C) भुजंग मेश्राम–उलगुलान

(D) वाहरू सोनवणे–गोधड

123. "शब्दांनीच पेटतात घरेदारे, देश आणि माणसेसुइधा,
शब्द विझवतात आगही, शब्दांनी पेटलेल्या माणसांची" – या काव्यपंक्ती कोणत्या कवितासंग्रहातील आहेत ?

(A) गावकुसाबाहेरील कविता

(B) कोंडवाडा

(C) माझे विद्यापीठ

(D) उत्खनन

**124.** खालीलपैकी कोणता कवितासंग्रह आनंद यादव यांचा नाही ?

(A) माय लेकरं

(B) मळ्याची माती

(C) बळिवंत

(D) हिरवे जग

**125.** 'सायरनचे शहर', 'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहांतून जागतिकीकरणादी एकविसाव्या शतकातील प्रश्नांविषयीची संवेदना कोणत्या कवीने व्यक्त केली आहे ?

(A) अरुण काळे

(B) प्रज्ञा लोखंडे

(C) श्रीधर तिळवे

(D) सचीन केतकर

**126.** 'मराठी बखर वाङ्मय मानदंड म्हणून शोभावा' अशी कोणती बखर आहे ?

(A) आज्ञापत्र

(B) महिलावतीची बखर

(C) भाऊसाहेबाची बखर

(D) सभासधची बखर

**127.** स्वजनाबद्दलच्या हीन अवस्थेबद्दल वाटणारी अनुकंपा, उद्धाराची तळमळ, नव्या ज्ञानविद्येची आवश्यकता, तिची तीव्र लालसा आणि या सर्वांच्या पाठीमागे उभी असणारी भेदक दृष्टी हे लोकहितवादी यांनी कोणत्या मासिकामधील लिहिलेल्या पत्रांचे विशेष म्हणून नमूद करता येतील ?

(A) विविधज्ञानविस्तार

(B) प्रभाकर

(C) सुधाकर

(D) दीनबंधू

**128.** केशीराजबासाने नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली कोणता ग्रंथ तयार केला ?

(A) लीळाचरित्र

(B) गोविंदप्रभू चरित्र

(C) सूत्रपाठ

(D) उद्धवगीता

**129.** ललित निबंधाचे आद्यप्रवर्तक म्हणून कोणास ओळखले जाते ?

(A) विष्णूशास्त्री चिपळूणकर

(B) लोकहितवादी

(C) वि. स. खांडेकर

(D) प्रा. ना. सी. फडके

130. 'सामान्य स्त्रीयेचा दृष्टांत' या दृष्टांतातून तेराव्या शतकात सतीप्रथा होती याचा दाखला मिळतो हा दृष्टांत कोणत्या ग्रंथातून आला आहे ?

(A) सूत्रपाठ

(B) लीळाचरित्र

(C) दृष्टांतपाठ

(D) धवळे

131. रसास्वाद म्हणजे भावनाजागृती होय, हा विचार रा. श्री. जोग यांनी कोणत्या ग्रंथामधून मांडला ?

(A) पोन

(B) सौंदर्यमीमांसा

(C) अभिनवकाव्यप्रकाश

(D) रसविमर्श

132. 'वाक्यं रसात्मकं काव्यम् ।' असे म्हणत रसाची आत्मपदी स्थापना कोणी केली आहे ?

(A) विश्वनाथ

(B) दण्डी

(C) गुणाढ्य

(D) मम्मट

133. 'विभाव, अनुभाव व व्याभिचारिभाव यांच्या संयोगातून रसनिष्पत्ति होते.' या रससूत्राची मांडणी कोणी केली ?

(A) उद्भट

(B) हर्ष

(C) श्रीशंकुक

(D) भरतमुनी

134. सौंदर्य हे एक स्वतंत्र, स्वायत्त आणि अंतिम मूल्य आहे, ही भूमिका कोणी मांडली आहे ?

(A) रा. ग. जाधव

(B) रा. भा. पाटणकर

(C) बा. सी. मर्ढेकर

(D) हरिश्चंद्र थोरात

135. कलाकृतीच्या अंतिम मूल्याच्या विवरणासाठी समीक्षकाजवळ सर्वसमावेशक असे जीवनाचे एक तत्त्वज्ञान असावे लागते, ही भूमिका मांडणाऱ्या 'कुसुमावर्तीची टीकादृष्टी' या निबंधाचे लेखन कोणी केले आहे ?

(A) रा. शं. वाळिंबे

(B) शरच्चंद्र मुक्तिबोध

(C) भालचंद्र नेमाडे

(D) द. भि. कुलकर्णी

136. साहित्यकृतीची समीक्षा करत असताना समीक्षकाला साहित्यकृतीच्या किती किती अंगांची जाण असणे आवश्यक आहे ?

(A) पाच

(B) सात

(C) आठ

(D) चार

137. 'कलाकृतीचे सौंदर्य हा सौंदर्यमीमांसेचा विषय नाही' हे विधान

(A) पूर्णपणे बरोबर आहे

(B) पूर्णपणे चूक आहे

(C) अंशत: बरोबर आहे

(D) अंशत: चूक आहे

**138.** एखादी साहित्यविषयक संकल्पना, दृष्टीकोण डोळ्यांसमोर ठेवून साहित्याची जी प्रत्यक्ष समीक्षा केली जाते त्या समीक्षेस म्हणतात

(A) सौंदर्यवादी समीक्षा

(B) रूपवादी समीक्षा

(C) उपयोजित समीक्षा

(D) ऐतिहासिक समीक्षा

**139.** साहित्यकृती वाचून साहित्यकृतीविषयीचा आपला अभिप्राय जेव्हा आपण इतरांना शब्दांद्वारे सांगतो तेंव्हा त्या शब्दरूप अभिप्रायाला काय म्हणतात ?

(A) वृत्तांत

(B) साहित्यसमीक्षा

(C) प्रतिक्रिया

(D) यापैकी नाही

**140.** खालील समीक्षाग्रंथाच्या कालानुक्रमे जोड्या लावा.

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| अ. आर्टस ॲण्ड मॅन | 1. 1970 |
| ब. सौंदर्य आणि साहित्य | 2. 1978 |
| क. सौंदर्यमीमांसा | 3. 1937 |
| ड. साहित्य, सौंदर्य आणि साहित्यमूल्य | 4. 1974 |

(A) अ – 3, ब – 1, क – 4, ड – 2

(B) अ – 4, ब – 2, क – 3, ड – 1

(C) अ – 2, ब – 4, क – 1, ड – 3

(D) अ – 3, ब – 2, क – 1, ड – 4

**141.** खालीलपैकी कोणते चरित्र कोणी लिहिले योग्य पर्याय सांगा.

1. विशष्णुशास्त्री चिपळूणकर – सॉक्रेटिसचे चरित्र
2. रा. गो. करंदीकर – बेंजामिन फ्रँकलीन
3. वि. प. रानडे – जॉर्ज वाशिंग्टन
4. महादेवशास्त्री कोल्हटकर – कोलंबसचा वृत्तांत

(A) वरीलपैकी केवळ पहिला व दुसरा पर्याय बरोबर आहे

(B) वरीलपैकी केवळ पहिला व तिसरा पर्याय बरोबर आहे

(C) वरीलपैकी केवळ पहिला, दुसरा व तिसरा पर्याय बरोबर आहे

(D) वरीलपैकी सर्व पर्याय बरोबर आहेत

**142.** आधुनिक काळी आत्मचरित्राचा खरा प्रारंभ ख्रिस्ती धर्म प्रचारक बाबा पद्मनजी यांनी केला त्यांचे आत्मवृत्त 'अरुणोदय' या नावाने कोणत्या साली प्रसिद्ध झाले ?

(A) 1882

(B) 1883

(C) 1884

(D) 1885

**143.** हिराइसा नावाच्या एका महानुभाव स्त्रीला हे लीळाचरित्र मुखोद्गत होते त्यांच्या मदतीने हा ग्रंथ पुन्हा कोणी लिहून काढला ?

(A) म्हाईंभट

(B) नागदेवाचार्य

(C) परशुराम व्यास

(D) श्री केशीराज व्यास

144. आज उपलब्ध असलेली रचनाकाळाच्या दृष्टीने सर्वात जुनी बखर कोणती ?

(A) सभासद बखर

(B) महिलावतीची बखर

(C) भाऊसाहेबांची बखर

(D) आज्ञापत्र

145. 'प्राचीन मराठी गद्य' या ग्रंथातून श्री. रं. कुलकर्णी यांनी बखरीचे किती वर्ग केलेले आहेत ?

(A) पाच

(B) सहा

(C) तीन

(D) चार

146. ज्या यंत्र-संस्कृतीबद्दल गांधीजींनी भय, चिंता व्यक्त केली होती, प्रचंड औद्योगिक उलाढालीतून आज जिला आपण 'चंगळवादी' संस्कृती संबोधतो तिच्यासंबंधीचे विदारक चित्रण (दर्शन) _______ च्या कवितेतून आपणांस घडते.

(A) केशवसूत

(B) केशवकुमार

(C) कवी 'बी'

(D) बा. सि. मर्ढेकर

147. मुळात _______ हाच संस्कृतीचा मूळ उगम आहे.

(A) धर्म

(B) माती

(C) सणवार

(D) शेती

148. 'मराठी साहित्यात आदिम जमातीकडे र. वा. दिघे यांनी प्रथम लक्ष वेधले' असे मत कोणी नोंदविले आहे ?

(A) कुसुमावती देशपांडे

(B) बाबा भांड

(C) नजूबाई गावित

(D) दीनानाथ मनोहर

149. महाराष्ट्रातील एक प्रमुख आदिवासी भिल्ल जमातीच्या जीवनचित्रणासाठी _______ या कादंबऱ्याचा आधारभूत म्हणून वापर केला आहे.

(A) झाडाझडती-पाणिपत

(B) बळी-पाणकळा

(C) तृष्णा-तंट्या

(D) मन्वंतर-झडीचे दिवस

150. खालीलपैकी अशोक व्हटकर यांची _______ ही कादंबरी आहे.

(A) पोखरण

(B) मेलेलं पाणी

(C) सूड

(D) टाहो

रफ़ कार्य / ROUGH WORK

SEAL

रफ़ कार्य / ROUGH WORK

SEAL



SEAL